**इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (DNT) विद्यार्थांना भारत सरकार ची डॉ. आंबेडकर मॅट्रीकपूर्व आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शिष्यवृत्ती-२०१८/प्र.क्र. ४८/ शिक्षण**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ मे, २०१९

**वाचा :** संयुक्त सचिव सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकिय पत्र क्रमांक १६०१४/ १/२०१४-BC-III दि. २२/०१/२०१५

**प्रस्तावना :-**

विमुक्त जाती भटक्या जमाती (DNT) प्रवर्गातील गरीब कुटूंबातील अनेक मुलांना त्यांच्या पालकांच्या पारंपारिक व्यवसायामध्ये मदत करावी लागते. त्यामुळे अशी गरीब कुटूंबातील मुले शाळेत नियमित जावू शकत नाही. त्यामुळे अशा गरीब वि.जा.भ.ज. प्रवर्गातील गरीब कुटूंबातील मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने भारत सरकारची डॉ. आंबेडकर मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०१४-१५ पासून सुरु केलेली आहे. सदरची योजना केंद्र शासनाने सन २०१६-१७ या वर्षापासून सुधारित केली आहे. केंद्र शासनाची सदर योजना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे पुढील प्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त वाचा मध्ये दिलेल्या निर्देशानुसार भारत सरकार डॉ. आंबेडकर **मॅट्रीकपूर्व** शिष्यवृत्ती ही योजना राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**(१) केंद्र शासनाची डी.एन.टी. विद्यार्थ्यासाठी डॉ.आंबेडकर मॅट्रिकपुर्व योजना:- सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व इतर अनुदानाचे दर पुढील प्रमाणे राहतील.**

| अ.क्र. | योजना | इयत्ता १ ली ते ८ वी | इयत्ता ९ वी ते १० वी मध्ये |
|---|---|---|---|
| १ | शिष्यवृत्तीचे दर (प्रतिमाह) (१० महिन्यांकरिता) | रुपये १००/- | रुपये १५०/- |

**(२) केंद्र शासनाची डी.एन.टी. विद्यार्थ्यासाठी डॉ.आंबेडकर मॅट्रिकोत्तर योजना:-**

| गट क्र. | | निर्वाहभत्ता (रुपये) अनुज्ञेय १० महिन्याकरीता | |
|---|---|---|---|
| | | वसतीगृहात राहणारे विद्यार्थी | वसतीगृहात न राहणारे विद्यार्थी |
| गट-१ | गट-१ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | १२०० | ५५० |
| गट-२ | गट-२ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ८२० | ५३० |
| गट-३ | गट-३ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ५७० | ३०० |
| गट-४ | गट-४ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ३८० | २३० |

**अ. सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहतील.**

१. या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ शासनाच्या मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणा-या विद्यार्थ्यांस अनुज्ञेय राहील.

२. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रुपये २.०० लक्ष वार्षिक इतकी राहील.

३. विद्यार्थीअनुर्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्तीचा लाभ बंद करण्यात येईल. ( अपवादात्मक परिस्थितीमध्ये सक्षम प्राधिका-यांनी अपरिहार्य कारण नमूद केले असेल त्या व्यतिरिक्त )

४. शिष्यवृत्ती मिळणेसाठी विद्यार्थ्यांने तो शिकत असलेल्या शाळेमार्फत संबंधित जिल्हयाच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी , जिल्हा परिषद यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

५. या योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यास अन्य मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.

६. या योजनेची अंमलबजावणी ही जिल्हा समाज कल्याण अधिकारी ,जिल्हा परिषद व समाज कल्याणअधिकारी (वर्ग-२) बृहमुंबई यांचे मार्फत करण्यात येईल.

७. या योजनेकरीता राज्यस्तरावर सह संचालक , विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,पुणे यांना आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी ,जिल्हा परिषद व समाज कल्याण अधिकारी (वर्ग-२) बृहमुंबई यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करतांना संगणकीय व्यवस्थापन प्रणाली वापरण्यात यावी.

९. शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांने शाळेत प्रवेश घेतलेल्या दिनांकापासून ते शाळा सोडल्याच्या दिनांकापर्यन्त दिर्घ मुदतीची सुट्टी वगळता शैक्षणिक वर्षातील १० महिन्यासाठी लागू राहील. (ज्या विद्यार्थांनी शैक्षणिक वर्षात उशिरा प्रवेश घेतला असेल किंवा शैक्षणिक वर्ष पुर्ण होण्यापुर्वी शाळा सोडली असेल असे विद्यार्थी वगळता)

१०. एकदा मंजूर झालेलीशिष्यवृत्तीचे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नुतनीकरण करण्यात येईल. तथापि, मागील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्याची उपस्थिती किमान ६०% नियमित उपस्थिती असने अनिवार्य राहील.

११. शिष्यवृत्तीची मंजूर रक्कम विद्यार्थाच्या आधार संलग्न बॅक खात्यावर जमा करण्यात येईल.

वरिल अटी व शर्तीप्रमाणेच केंद्र शासनाच्या दि २२.०१.२०१५ तसेच सन २०१६-१७ च्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या अन्य सर्व अटी व शर्ती या योजनेस लागू राहतील.

सदर योजने करीता आवश्यक निधी केंद्र हिस्सा ७५ टक्के व राज्य हिस्सा २५ टक्के असा राहील. ही योजना केंद्र शासनाची मर्यादित निधी ( Limited Fund )योजना आहे. या योजनेसाठी आवश्यक तरतुद सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासुन  वार्षिक योजनेअंतर्गत राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येईल.

सदर योजनेवरील होणारा खर्च २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गांचे कल्याण, २७७, शिक्षण, ०२, शिष्यवृत्त्या विद्यावेतने, १६, इतर डी.एन.टी. प्रवर्गातील  विद्यार्थ्यांसाठी डॉ. आंबेडकर मॅट्रिक पूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, **केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ७५%)** (२२२५F१९२), २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांकयांचे कल्याण, ०३, मागासवर्गांचे कल्याण, २७७, शिक्षण, ०२, शिष्यवृत्त्या विद्यावेतने, १७, डी.एन.टी. प्रवर्गातील  विद्यार्थ्यांसाठी डॉ. आंबेडकर मॅट्रिक पूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना **केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा २५%) (२२२५F२०९)** या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१९०५२८१२४३४६८८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.05.28 12:47:04 +05'30'

**( रविंद्र गुरव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्रयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री, (विजाभज) यांचे खाजगी सचिव
६.मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानभवन, मुंबई
७.मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधान परिषद व विधानसभा सदस्य
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे

१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
१६. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२०. संचालक, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. कुल सचिव, सर्व कृषी/ अकृषी विद्यापीठे
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर
२६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२९. निवडनस्ती (शिक्षण).